संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

# राष्ट्रीय सेवा योजना

दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित

**श्री रा. ल. तो. विज्ञान महाविद्यालय, अकोला**

# अहवाल

# "स्वच्छ भारत स्वस्थ भारत"

**सत्र २०१८-१९**

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

दि. बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी, अकोला द्वारा संचालित

# श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालय, अकोला

## स्वच्छ भारत स्वस्थ भारत अभियान

## सत्र : २०१८-१९

| अ. क्र. Sr.no. | घटक (Particulars) | पान क्र. Page no. |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | |
| २. | मुनिजन समिती व Action Plan | |
| ३. | अहवाल | |
| ४. | छायाचित्रे | |
| ५. | वृत्तपत्र कात्रणे | |

**SHRI R.L.T. COLLEGE OF SCIENCE, AKOLA**

**MUNIJAN FOR**

**SWACHHA BHARAT ABHIYAN (2014-2019) COMMITTEE**

| Sr.no | Designation | Name |
|---|---|---|
| 01 | Chief Programme Co-ordinator | Principal Dr. V.D. Nanoty |
| 02 | Program Co-ordinator | Dr. S. R. Kohchale |
| 03 | Program Co Co-ordinator | Dr. R. P. Joshi (Sawalkar) |
| 04 | IQAC Co-ordinator | Dr. R.L. Rahatgaonkar |
| 05 | Member | Dr. P.T. Agrawal |
| 06 | Member | Dr. R. D. Chandrawanshi |
| 07 | Member | Prof. R.D. Chaudhari |
| 08 | Member | Prof. Ku. S. B. Tadam |
| 09 | Member | Prof. P.R. Kawle |
| 10 | Member | Dr. Ku. A.G. Thakare |
| 11 | Member | Dr. A.G. Sarap |
| 12 | Member | Prof. P.P. Gedam |
| 13 | Member | Mr. K.Y. Patil |
| 14 | Member | Mr. D.J. Wankhade |

**(Dr. V. D. Nanoty)**

Principal,

Shri R.L.T. College of Science, Akola

**मुनीजन अभियानातून गुणीजन घडतील - मुख्यमंत्री माननीय देवेन्द्रजी फडणवीस:**
राज्यातील सर्व विद्यापीठांनी एकत्रित येऊन सुरू केलेल्या 'मुनीजन' स्वच्छ भारत अभियानातून गुणीजन तयार होतील, असा आशावाद मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. स्वच्छता हे एक जीवनमूल्य असून ते प्रत्येकाने स्वीकारल्यास आपला देश खऱ्या अर्थाने स्वच्छ आणि सुंदर होईल असेही ते म्हणाले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना कोणतेही काम करण्याच्या तीन पायऱ्या सांगितल्या.

'मुनीजन' या उपक्रमाचे उद्घाटन गुरुवारी मुंबई विद्यापीठातील दिक्षांत सभागृहात पार पडले. यावेळी मुख्यमंत्र्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या उपक्रमात राज्यातील १८ विद्यापीठांतील सुमारे ४५०० महाविद्यालयांच्यावतीने हे स्वच्छता अभियान राबविले जाणार आहे. या कार्यक्रमात उच्च व तंत्र शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना स्वच्छता आणि समृद्धी या एकाच नाण्याच्या दोन बाजू असून राज्यातील युवाशक्ती या कामात पुढे आली तर हे अभियान नक्कीच यशस्वी होईल असे नमूद केले. हे अभियान राबविण्यासाठी पाच वर्षांचा कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. यामध्ये सवरेत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या महाविद्यालयाला कुलगुरू चषकाने गौरविले जाणार आहे. असाच गौरव राज्य सरकारतर्फेही केला जावा, अशी सूचना मुख्यमंत्र्यांना व्यासपीठावरूनच तावडे यांनी केली. या कार्यक्रमाला सर्व विद्यापीठांचे कुलगुरू आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## अ ) स्वच्छ भारत अभियान पंधरवडा शपथ (दि.१.८.२०१८)

विभागीय संचालक, युवा कल्याण व क्रीडा विभाग , भारत सरकार नवी दिल्ली यांच्या पत्रानुसार महाविद्यालयातील रा.से.यो. च्या स्वयसेवकांनी "स्वच्छ भारत अभियान पंधरवाडा" शपथ दि.१.८.२०१८ (बुधवार) रोजी महाविद्यालयात घेण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. डी. नानोटी होते तर प्रमुख अतिथी रा. से. यो. चे क्षेत्रीय समन्वयक प्रा. डॉ. सुधीर कोह्चाळे होते.

प्राचार्य डॉ. व्ही. डी. नानोटी सरांनी आपल्या अध्यक्षीय भाषणाची सुरुवात "स्वच्छ भारत स्वस्थ भारत" शपथीने केली आणि सोबतच रा.से.यो. च्या सर्व स्वयसेवकांनी सुद्धा स्वच्छता शपथ घेतली आणि प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना "स्वच्छ भारत स्वस्थ भारत" या विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाप्रसंगी लाभलेले प्रमुख अतिथी रा.से.यो. चे क्षेत्रीय समन्वयक प्रा. डॉ. सुधीर कोह्चाळे यांनी "स्वच्छता पाळा रोगराई टाळा " या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन यशश्री डाबेराव हिने केले तर आभार प्रदर्शन निकिता ठाकरे हिने केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. रश्मी जोशी (सावलकर) यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.समाधान मुंडे व इतर रा. से. यो. च्या स्वयसेवकांनी परिश्रम घेतले आणि शेवटी कार्यक्रमाची सांगता कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.समाधान मुंडे यांनी "स्वच्छ भारत का इरादा , इरादा कर लिया हमने; देश से अपने वादा, वादा कर लिया हमने " या गीताने केली.

## ब) महाविद्यालयीन परिसर स्वच्छता (दि.२.८.२०१८.ते ५.८.२०१८)

स्वच्छ भारत अभियान पंधरवाडा या मोहिमे अंर्तगत महाविद्यालयीन रा.से.यो.च्या विध्यार्थ्यांनी दि.२.८.२०१८ ते ५.८.२०१८ या चार दिवसात महाविद्यालयीन परिसर स्वच्छता, वर्ग खोल्या , प्रयोगशाळा , ग्रंथालय , बाथरूम , महाविद्यालयातील सभागृह, महाविद्यालयाच्या समोरील रस्ता व इतर परिसर ची स्वच्छता करण्यात आली . या स्वच्छता मोहीमेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य माननीय डॉ. व्ही. डी. नानोटी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.समाधान मुंडे व महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. रश्मी जोशी (सावलकर) यांनी रा. से. यो. च्या विद्यार्थासोबत स्वच्छता मोहीम उत्कृष्ठ रित्या राबविली आणि आली.

## क) स्वच्छते कडून समृद्धीकडे ग्राम सोनाळा लोकांना संदेश
## (दि. ६.८.२०१८ ते १०.८.२०१८)

स्वच्छ भारत अभियान पंधरवाडा या मोहिमे अंर्तगत महाविद्यालयीन रा.से.यो.च्या विध्यार्थ्यांनी ग्राम सोनाळा येथे दि.६.८.२०१८ ते १०.८.२०१८ या पाच दिवसामध्ये गावातील लोकांना स्वचतेबद्दल सांगण्यात आले. स्वच्छता आजच्या काळाची गरज आहे, स्वच्छता पाळा रोगराई टाळा अश्या विषयावर लोकांना सांगण्यात आले आणि स्वच्छता हि आपल्या स्वताच्या शरीरापासून सुरु करायची नंतर आपले घर , संडास , बाथरूम , घरासमोरील परिसर , गावातील रस्ता स्वच्छ ठेवायला पाहिजे असे रा.से.यो.च्या विध्यार्थ्यांतर्फे गावातील लोकांना सांगण्यात आले तर काही रा.से.यो.च्या विध्यार्थ्यांनी प्राथमिक शाळेमध्ये जाऊन लहान मुलांना स्वच्छते बद्दल मार्गदर्शन केले व जी मुले स्वच्छ आहेत त्यांना रा.से.यो.च्या विध्यार्थ्यांनी चॉकलेट्स चे वाटप करून त्यांना आनंदित केले. लहान मुलांना आपले घर , आंगण , घरामोरील रस्ता, गावातील रस्ते स्वच्छ असतील तर आपण स्वस्थ आणि निरोगी राहू असे सांगण्यात आले आणि हाथपाय स्वच्छ ठेवणे, नखे कापणे इत्यांदी गोष्टी सांगण्यात

आल्या.  गावातील महिलांना एक आगळावेगल्या पद्धतीनी संदेश देण्यात आला, “सुंदर माझे आंगण” अशी एक रांगोळी स्पर्धा घेऊन त्या स्पर्धेतील सुंदर आंगण वाले तीन पारितोषिक देण्यात आले व त्यांना घरदार असेच स्वच्च ठेवण्याचे आवाहन करण्यात आले. रोज या स्वच्छते  मोहिमे अंर्तगत महाविद्यालयीन  रा.से.यो.च्या विध्यार्थ्यांनी ग्राम सोनाळा लोकांना एक प्रकारचा स्वच्छते कडून समृद्धीकडे  जाण्याचा संदेश दिला.

## ड)  महापुरुष्याच्या पुतळ्याची स्वच्छता (दि. १४.८.२०१८)

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनाच्या स्वयसेवकांनी दि. १४.८.२०१८ (मंगळवार) रोजी अकोला बसस्थानकासमोरील मदनलाल धीग्रा चौकालगत असलेला ब्रिजलाल बियाणी यांच्या पुतळ्याच्या आजूबाजूच्या परिसराची  स्वच्छता करून  तेथील आजूबाजूच्या लोकांना त्या परिसरात स्वच्छता पाळा रोगराई टाळा असा संदेश रा. से.यो. च्या स्वयसेवकांतर्फे देण्यात आला. त्याचप्रमाणे नजीकच्या गांधी जवाहर उद्यानामधील राष्ट्रपिता महात्मा गांधी व पंडित जहाहार्लाल नेहरू या महापुरुष्याच्या पुतळ्यावर  पाणी मारून स्वच्छता करण्यात आली   तसेच उद्यानाच्या सर्व परिसराची   स्वच्छता करण्यात आली. उद्यानाची स्वच्छता झाल्यानंतर प्रा. डॉ. सुधीर कोह्चाळे यांनी रा. से.यो. च्या स्वयसेवकांना “माझ्या घराची स्वच्छता म्हणजे माझ्या अंगणाची स्वच्छता ; माझ्या अंगणाची स्वच्छता म्हणजे माझ्या गावाची स्वच्छता ; माझ्या गावाची स्वच्छता म्हणजे माझ्या शहराची  स्वच्छता;  माझ्या शहराची स्वच्छता म्हणजे माझ्या भारत देशाची स्वच्छता ” अश्या प्रकारचे मार्गदर्शन सुद्धा यावेळी करण्यात आले.

**राष्ट्रपिता गांधी ह्यांच्या १५० व्या जयंती निमित्य महाविद्यालयाच्या रासेयो तर्फे साप्ताहिक विविध कार्यक्रम  राबविण्यात आले:**

दि.२४ सप्टेम्बर ते ०२ ऑक्टोबर २०१८ ह्या कालावधित महाराष्ट्र शासन उच्च तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या परिपत्रकानुसार श्री रालतो विज्ञान महाविद्यालाच्या रासेयो पथकाद्वारे विविध कार्यक्रम राबविण्यात आले. दि. २४ सप्टेम्बर रोजी “स्वच्छता हि सेवा” ह्या कथानकाच्या आधारावर महाविद्यालाचे परिसर स्वच्छ करण्यात आले. पूर्ण प्रांगण, खोल्या, बगीचा , रस्ते व सर्व परिसर स्वच्छतेचे धडे देत देत आव्हाहन केले गेले.

दि. २५ सप्टेम्बर रोजी दत्तक ग्राम सोनाला येथे जनजागृती करण्यात आली. गावात रासेयोच्या चमू नी घरोघरी, दारोदारी जाऊन गावकर्यांमध्ये स्वच्छतेचे व आरोग्याच्या रक्षणाचे  बी रुजविण्याचे प्रयत्न केले गेले.

विद्यार्थ्याच्या विविध प्रतियोगिता घेण्यात आल्या. निबंध स्पर्धा, विषय होते “प्लास्टिक फ्री इंडिया” आणि “ गांधीजींच्या जीवनावर व त्यांचे कार्य ” ह्या विषयावर वक्तृत्व स्पर्धा घेण्यत आल्या. ह्या स्पर्धेच्या माध्यमातून जनजागृती करण्याचे काम केल्या गेले. रासेयोच्या विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रातिसाद लाभला. कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी व डॉ.समाधान मुंडे ह्यांनी रासेयो चे क्षेत्रीय समन्वयक डॉ. कोह्चाले व माननीय प्राचार्य डॉ. वी डी नानोटी ह्यांच्या मार्गदर्शनाखाली हे साप्ताह चांगल्या विविध रित्या राबविण्यात आले.

दि. ०२ ऑक्टोबर २०१८ रोजी श्री रालतो महाविद्यालयाच्या सभागृहात रासेयोच्या १०० स्ववाम्सेवक आणि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचार्याच्या उपस्थितीत १५० सावी गांधी जयंती कार्यक्रम घेण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नानोटी होते . रासेयोचे क्षेत्रीय समन्वयक डॉ. कोह्चाले व डॉ. चव्हाण, इलेक्ट्रोनिक्स विभाग प्रमुख, ह्यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे संचालन रासेयो कार्य.अधि. डॉ. रश्मी जोशी ह्यांनी केले व आभार प्रदर्शन डॉ. समाधान मुंडे ह्यांनी केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली व व्यसन मुक्ती करिता विद्यार्थ्यांना शपथ देण्यात आली. त्यानंतर स्वच्छता रेली काढण्यात आली, त्यामध्ये रासेयोची चमू व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सहभाग लाभला. सोबत दिलेल्या वेब लिंक वर रेली बद्दल माहिती आहे.

https://youtu.be/Zh0EudZHTnY

*आर.एल.टी. च्या विद्यार्थ्यांचे स्वच्छता जनजागृती अभियान...*
अकोल्यातील आर.एल.टी. विज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी गांधी जयंती निमित्त स्वच्छते बाबत व्यापक जनजागृती साठी रॅली काढून व चौकात पथ नाट्यचे प्रयोग करून एक आगळा वेगळा प्रयोग केला आहे.
*सविस्तर माहितीसाठी विद्रोही न्यूज चॅनल पहा*

**(१६ ऑगस्ट २०१८) जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, अकोला च्या वतीने “स्वच्छ सर्वेक्षण-२०१८ (ssg १८) एप ” बद्दल नोंद व प्रतिक्रिया:**

उपरोक्त स्वच्छ भारत मिशन ग्रा. अंतर्गत केंद्र शासनाच्या वतीने देशभरात १ ते ३१ ऑगस्ट २०१८ या कालावधीत स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण -२०१८ हि मोहिम सुरू करण्यात आली होती. या द्वारे अकोला जिल्ह्याची स्वच्छतेबाबतची स्थिती जाणून घेण्याकरिता केंद्र सरकार जनतेमधून ssg१८ या ऐप द्वारे महाविद्यालयाच्या सर्व रासेयो अधिकारी व स्वयंसेवकांकडून प्रतिक्रिया नोंदवून प्रशासनास मदत केल्या गेली. अशी हि एक समाजात जागरूकता निर्माण करण्याकरिता केलेली रासेयो चमू नी केलेला एक प्रयत्न. ह्या ऐप द्वारा स्वच्छते विषयक चार प्रश्नांद्वारे प्रतिकिया दिल्या गेल्या होत्या.

<table>
<tr><td>
</td><td>
</td></tr>
<tr><td>मुनिजन, स्वच्छ भारत अभियान राबवितांना रासेयोची चमू</td><td>म्हिवद्यालातील स्वच्छता करतांना विद्यार्थी</td></tr>
<tr><td>
</td><td>
</td></tr>
<tr><td colspan="2">परिसर स्वच्छ करतांना विद्यार्थिनी व कचर्याची विल्हेवाट करतांना मुली.</td></tr>
<tr><td>
</td><td>
</td></tr>
<tr><td colspan="2">रासेयो च्या कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी सावलकर व क्षेत्रीय समन्वयक डॉ.कोह्चाले आणि विद्यार्थिनी खोल्या स्वच्छ करतांना .</td></tr>
</table>







विद्यार्थिनी व महिला कार्यक्रम अधिकारी कचरा गोळा करून घन्न्टा गाडी मध्ये कचरा टाकतांना.







**“स्वच्छता एप ssg-१८” बद्दल माहिती सांगतांना प्रशासन अधिकारी आणि रायेयो ची चमू.**






रासेयो विशेष शिबीरसोनाला जानेवारी २०१८ ग्राम सोनाळा येथे प्रभात फेरीतून जनजागृती





परिसर स्वच्छ ठेवून सांडपाण्याची नाले बांधून स्वच्छता मोहीम राबविली.






ग्राम सोनाळा येथे प्रभात फेरी दरम्यान घरोघरी जाऊन जनजागृती करतांना स्वयंसेवक.





पथनट्याच्या माध्यमातून पाणी साचल्याने होणार्या आजाराना रोखण्याचे उपाय तासेच परिसर स्वच्छ ठेवून निरोगी राहण्याचे उपाय गावकर्यां पर्यंत पोहोचविण्याचे कार्य केल्या गेले.

<table>
<tr><td>
</td><td>
</td></tr>
<tr><td colspan="2">२ ऑक्टोबर२०१८, गांधीजींची १५० सावी जयंती निम्मित्य "स्वच्छ भारत अभियान" कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालाचे प्राचार्य डॉ.वी.डी. नानोटी, रासेयोचे क्षेत्रीय समन्वयक डॉ. कोहचाले, संचालन करतांना रासेयो कार्य.अधि. डॉ. रश्मी जोशी, डॉ. समाधान मुंडे व इतर मान्यवर. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली त्यानंतर स्वच्छता रेली काढण्यात आली, त्यामध्ये रासेयोची चमू व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सहभाग लाभला.</td></tr>
<tr><td>
</td><td>
</td></tr>
<tr><td>रेली दरम्यान रस्त्यावरची स्वच्छता करताना घंटागाडी सोबत कचरा काढतांना रासेयो अधिकारी व स्वयंसेवक</td><td>गांधीजी व संत गाडगे बाबा ह्यांची वेशभूषा धारण केलेले रासेयोचे विद्यार्थी व अधिकारी</td></tr>
</table>







अकोला बस स्थानकावर रासेयोची पूर्ण चमू. क्षेत्रीय समन्वयक डॉ. सुधीर कोह्चाले तसेच प्राचार्य डॉ.नानोटी ह्यांच्या मार्गदर्शनाखाली ह्या रेलीचे आयोजन करण्यात आले.







रासेयो स्वयंसेवकांनी,"इरादा कर लिया हमने" हे गाणं म्हणार रेली दरम्यान जागृती केली व बस स्थानकावर व इतर ठिकाणी सुंदर असे पथनाट्या सादर केले.






गांधी जयंतीनिमित्त रेली मध्ये रस्ता स्वच्छता करतांना महाविद्यालाचे प्राचार्य व इतर.

अकोला बस स्थानकावर स्वच्छता करतांना रासेयो कार्य.अधि. डॉ. रश्मी जोशी सावलकर न चमू

| | |
|---|---|
|   |  |
| अकोला बस स्थानकावर लोकांना जनजागृती करतांना व स्वच्च्ता ठेवून, कचऱ्याची विल्हेवाट कशी करावी ह्याचे मार्गदर्शन व आव्हाहन करतांना डॉ. सुधीर कोह्चाले, डॉ. रश्मी जोशी, डॉ. मुंडे, प्राध्यापक जैस्वाल व प्रा. सोनाली गवांदे ह्यांनी केले. | |

**दत्तक ग्राम आपोती (खुर्द) येथे स्वच्छतेची विशेष मोहीम राबविल्या गेली (१६ ते २३ डिसेंबर २०१८)**

श्री. रा.ल.तो. विज्ञान महाविद्याचे विशेष शिबीर ग्राम आपोती(खुर्द) येथे घेण्यात आले. गावात रासेयोची चमू रोज प्रभात फेरीच्या माध्यमातून स्वच्च्ते विषयी जन जागृती करण्यात आली. विद्यार्थांनी नारे लावत व रस्ता, आंगण, घर, नाले, व परिसर कसे स्वच्छ ठेवावे ह्याचे पाठ्नाटयाच्या माध्यमातून गावकर्यांना शिकविले.

| | |
|---|---|
|  |   |
| रासेयो ची प्रभात फेरी ग्राम आपोती खुर्द येथे | स्वच्चता कारताना रासेयोचे स्वयंसेवक |






रालतो विज्ञान महाविद्यालय, रासेयोचे विशेष शिबीर ग्राम आपोती खुर्द येथे १०० स्वयंसेवकांनी रेली मध्ये नारे लावत व जनजागृती करत स्वच्छता केली.






स्वच्छतेना सोबतच गावातील नदीवर बंधारा बांधण्यात आला तसेच नदीच्या पत्रातील माती खणून त्याला पाणी साठ्वाण्याकरिता खोल करून स्वच्छ करण्यात आले.

# Shri R L T College of Science, Akola



Principal Dr Vijay Nanoty receiving NSS award as others look on.

DISTRICT-level *Swachcha Bharat Swastha Bharat Abhiyan* (Clean India, Healthy India mission) Excellent College Award was presented to Shri R L T College of Science, Akola at the hands of Dr Murlidhar Chandekar, Vice-Chancellor of Sant Gadge Baba Amravati University, Amravati for the session 2017-18. NSS volunteers of the college had made excellent work in educational along with social work. Dr Rashmi Joshi led girls' volunteers making awareness by implementing various programmes. Selection Committee selected the college for excellent works in district-level. The college was honoured with memento and certificate. Principal Dr Vijay Nanoty, Dr S R Kohchale, Zone Co-ordinator, Dr S L Munde Programme Officer received the award on behalf of college. Dr P B Shingwekar, Acting Director of NSS, including coordinators of five districts were present on the dais. Dr R B Heda, President of BGE society, Vijay Toshniwal, senior Vice-president, Dr Ravindra Jain, Junior Vice-president, Adv Motisingh Mohta, honorary Secretary, Sharad Chavre, Co-secretary, professors, non-teaching staff and employees are being congratulated for the award.




**पारितोषिक स्वीकारतांना मान. प्राचार्य डॉ. वी.डी. नानोटी, डॉ. सुधीर कोहचाले व रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी सावळकर.**

सकाळ
बुधवार, १९ सप्टेंबर २०१८ | २



**अकोला : स्वच्छतेचा पुरस्कार स्वीकारताना रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य.**

# 'आरएलटी'ला जिल्हास्तरीय स्वच्छ भारत अभियान उत्कृष्ठ महाविद्यालय पुरस्कार

**सकाळ वृत्तसेवा**

अकोला, ता.१८: श्री . रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयास संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती रासेयो अंतर्गत जिल्हास्तरीय स्वच्छ भारत स्वस्थ भारत अभियान उत्कृष्ठ महाविद्यालय पुरस्कार नुकताच संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

सत्र २०१७-१८ मध्ये महाविद्यालयाच्या रासेयो पथकाने शैक्षणिक कार्यासोबत उत्कृष्ट सामाजिक कार्य केले. मुलींच्या पथकाचे नेतृत्व डॉ.रश्मी जोशी यांनी केले. विविध नाविण्यपूर्ण उपक्रम राववून जनजागृती केली. यामध्ये महाविद्यालयाने केलेल्या कार्यांची निवड समिती मार्फत जिल्हास्तरीय निवड करण्यात आली. पुरस्कारामध्ये स्मृतिचिन्ह तसेच प्रमाणपत्र देण्यात आले. महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ.विजय नानोटी, क्षेत्रिय समन्वयक डॉ.एस.आर. कोहचाळे, कार्यक्रम अधिकारी डॉ.एस.एल. मुंडे यांनी पुरस्कार स्वीकारला. यावेळी मंचावर रासेयो प्र. संचालक डॉ.पी.बी. शिंगवेकर तसेच पाचही जिल्हयाचे समन्वयक उपस्थित होते. या पुरस्कारा बद्दल बी.जी.ई. संस्थेचे अध्यक्ष डॉ. आर.बी. हेडा, वरिष्ठ उपाध्यक्ष विजय तोष्णीवाल, कनिष्ठ उपाध्यक्ष डॉ.रविंद्र जैन, मानद सचिव ॲड. मोतीसिंह मोहता, सहसचिव शरद चवरे यांचेसह कार्यकारिणी सदस्य तसेच महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षक, शैक्षणिक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

नवभारत
विदर्भ
19 सितंबर 2018

# RLT महाविद्यालय को मिला पुरस्कार

## उप कुलपति चांदेकर ने दिया स्मृतिचिन्ह

**अकोला (का).** स्थानीय आर.एल.टी.विज्ञान महाविद्यालय को संत गाड़गे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती के राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत जिला स्तरीय स्वच्छ भारत स्वस्थ्य भारत अभियान उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार प्रदान कर सम्मानित किया गया. यह पुरस्कार अमरावती विद्यापीठ के उप कुलपति डा.मुरलीधर चांदेकर के हाथों स्मृतिचिन्ह तथा प्रमाणपत्र प्रदान किया गया है. 2017-18 में महाविद्यालय के रासेयो दल ने शिक्षा कार्य के साथ साथ उत्कृष्ट सामाजिक कार्य किया. छात्राओं के दल का नेतृत्व डा. रश्मी जोशी ने किया. विद्यार्थियों ने उत्कृष्ट उपक्रम चलाकर जनजागृति की. जिससे महाविद्यालय के कार्यों की चयन समिति द्वारा जिलास्तर पर चयन किया गया.

पुरस्कार प्रदान समारोह में प्राचार्य डा.विजय नानोटी, क्षेत्रिय समन्वयक डा.एस.आर. कोहचाले, कार्यक्रम अधिकारी डा.एस.एल. मुंडे ने उपस्थित रहकर यह पुरस्कार ग्रहण किया. मंच पर रासेयो प्र.संचालक डा.पी.बी. शिंगवेकर तथा पांचों जिले के समन्वयक उपस्थित थे. महाविद्यालय द्वारा पुरस्कार प्राप्त करने पर बी.जी.ई. संस्था अध्यक्ष डा.आर.बी. हेडा, वरिष्ठ उपाध्यक्ष विजय तोष्णीवाल, कनिष्ठ उपाध्यक्ष डा.रवींद्र जैन, मानद सचिव एड.मोतीसिंह मोहता, सहसचिव शरद चवरे सहित सह कार्यकारिणी सदस्य, प्राध्यापक, शिक्षक व कर्मचारियों ने अभिनंदन किया है.

# भरगड़ प्रदेश युकां के सचिव पद पर विजयी

**अकोला (का).** हाल ही में महाराष्ट्र प्रदेश युवक कांग्रेस के विविध पदों के लिए चुनाव हुए. यह चुनाव अध्यक्ष, उपाध्यक्ष, महासचिव, सचिव पदों के लिए हुए थे. चुनाव में सचिव पद के लिए अकोला के पूर्व महापौर मदन भरगड़ के पुत्र अभिषेक भरगड़ ने भारी मतों से जीत हासिल की. चुनाव के लिए 9, 11 और 12 सितंबर को तीन चरणों में मतदान लिया गया. प्रदेश युवक कांग्रेस कमेटी के महासचिव पद के लिए महाराष्ट्र से 104 युवक चुनाव मैदान में थे. जिसमें अकोला के अभिषेक भरगड़ सर्वाधिक 2,452 वोट प्राप्त कर विजयी हुए. संपूर्ण महाराष्ट्र में विजयी हुए उम्मीदवारों में अभिषेक भरगड़ 13वें नंबर पर थे.

TheHitavada
NAGPUR ■ Thursday ■ September 20 ■ 2018

# Shri R L T College of Science, Akola



Principal Dr Vijay Nanoty receiving NSS award as others look on.

DISTRICT- level *Swachcha Bharat Swastha Bharat Abhiyan* (Clean India, Healthy India mission) Excellent College Award was presented to Shri R L T College of Science, Akola at the hands of Dr Murlidhar Chandekar, Vice-Chancellor of Sant Gadge Baba Amravati University, Amravati for the session 2017-18. NSS volunteers of the college had made excellent work in educational along with social work. Dr Rashmi Joshi led girls' volunteers making awareness by implementing various programmes. Selection Committee selected the college for excellent works in district-level. The college was honoured with memento and certificate. Principal Dr Vijay Nanoty, Dr S R Kohchale, Zone Co-ordinator, Dr S L Munde Programme Officer received the award on behalf of college. Dr P B Shingwekar, Acting Director of NSS, including coordinators of five districts were present on the dais. Dr R B Heda, President of BGE society, Vijay Toshniwal, senior Vice-president, Dr Ravindra Jain, Junior Vice-president, Adv Motisingh Mohta, honorary Secretary, Sharad Chavre, Co-secretary, professors, non-teaching staff and employees are being congratulated for the award.

मातृभुमी 07/10/18

# रा.ल.तो. महाविद्यालयाच्या

अकोला दि. ७ :- स्थानिक श्री रा.ल.तो. महाविद्यालय अकोलाच्या रा.से.यो पथकाद्वारे स्वच्छता हिच सेवा अभियान अंतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन दि. २४ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबरपर्यंत करण्यात आले. दि. २४ सप्टेंबर रा.से.यो. वर्धापन दिनाचे औचित्य साधुन महाविद्यालया मध्ये रा.से.योच्या स्वयंसेवका मार्फत महाविद्यालयातील संपुर्ण परिसर तसेच महाविद्यालयापासुन ते सिव्हील लाईन चैकापर्यंतचा परिसर व रस्त्याची स्वच्छता करण्यात आली. त्याचप्रमाणे २ ऑक्टोबर राष्ट्रपिता महात्मा गांधी हयांच्या १५० वी जयंती व लालबहादुर शास्त्री यांच्या जयंतीचे औचित्य साधून सकाळी महाविद्यालयामध्ये त्यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विजय नानोटी यांनी रा.से.यो.च्या विद्यार्थ्यांना अध्यक्षिय भाषणामध्ये स्वच्छता हिच सेवा तर



प्रमुख उपस्थितीमध्ये रा.से.यो.चे क्षेत्रिय समन्वयक डॉ.सुधिर कोहचाळे यांनी 'एक कदम स्वच्छता की ओर' या विषयावरती रा.से.यो. च्या विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन करण्यात आले. तसेच प्रा.अंभोरे व अक्षय घोपे यांनी सुध्दा स्वच्छतेबद्दल विविध उदाहरणे देवुन आपण स्वस्थ कसे राहू याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती सांगण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रोहीणी शेलवणे, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ.रश्मी सावलकर यांनी केले.

रा.से.यो.च्या अभिवादन कार्यक्रमानंर स्वच्छता रॅलीचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय नानोटी यांच्या उपस्थितीत करण्यात आले. स्वच्छता रॅलीमध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य रा.से.यो. चे कार्यक्रम अधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, रा.से.यो., छात्र सेनेचे जवळपास १४० विद्यार्थी मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. स्वच्छता रॅलीमध्ये महात्मा गांधीजींच्या वेशात गोविंद आंधळे तर संत गाडगे महाराजांच्या वेशात गौरव खवणे यांनी प्रमुख भूमिका निभावली व दोन्हीही विद्यार्थी स्वच्छता रॅलीचे ...कर्षण ठरले. रॅलीमध्य रा.से.यो.च्या विद्यार्थ्यांनी स्वच्छता हिच सेवा या विषयावरतील विविध घोषवाक्याचे फलक हातात घेवुन नारे लावत स्वच्छता रॅली महाविद्यालयापासुन ते सिव्हील लाईन चैक व तेथुन अकोला मध्यवर्ती बसस्थानकापर्यंत स्वच्छता करत रॅली काढण्यात आली. विविध ठिकाणी रा.से.यो. च्या स्वयंसेवकांनी लोकांमध्ये जनजागृती निर्माण करण्याकरीता पथनाटयाचे सादरीकरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रा.से.यो. चे कार्यक्रम अधिकारी डॉ.रश्मी जोशी-सावलकर, डॉ.समाधान मुंडे, सहकार्यक्रम अधिकीर प्रा.शैलेष जयस्वाल, प्रा.सोनाली गवादे, डॉ.रोहित अग्रवाल, के.वाय.पाटील, किशोर शेगोकार, शैलेष अलोणे, चंद्रकांत अहिरकर व रा.से.यो, रा.छा.से च्या सर्व विद्यार्थ्यांनी परीश्रम घेतलेत.

दिव्य मराठी 07/10/2018

# रा.ल.तो. महाविद्यालयातील रासेयो पथकाने राबवले स्वच्छता अभियान

अकोला । रा.ल.तो. महाविद्यालयातील रासेयो पथकाद्वारे स्वच्छता अभियान राबवण्यात आले. महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ करण्यात आला. महाविद्यालय ते सिव्हिल लाईन चौकापर्यंतचा परिसरात स्वच्छता करण्यात आली. म. गांधी यांच्या शतकोत्तर सुवर्ण जयंती वर्षानिमित्त स्वच्छतेस प्राधान्य दिले. प्राचार्य डॉ. विजय नानोटी यांनी गांधीजींचे विचार समाजाला प्रेरक आहेत. बापूंनी स्वच्छतेला जीवनात प्राधान्य दिले होते. आधी केले मग सांगितले या तत्त्वानुसार त्यांचे जगणे होते. सत्याचे प्रयोग त्यांनी जगाला दिलेली देण असल्याचे नानोटी यांनी सांगितले.

रा.से.यो. चे क्षेत्रीय समन्वयक डॉ. सुधीर कोहचाळे यांनी एक पाऊल स्वच्छतेकडे यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रा. अंभोरे, अक्षय झोपे यांनी स्वच्छतेविषयी उदाहरणे देऊन स्वस्थ जीवनाविषयी माहिती देली. प्रास्ताविक रोहिणी शेलवणे, हिला कार्यक्रम अधिकारी डॉ. रमी सावलकर यांनी केले. स्वच्छता फेरीही काढली होती. स्वच्छता रॅलीत प्राचार्य,रा.से.यो. चे कार्यक्रम अधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, रा.से.यो. छात्र सेनेचे विद्यार्थी सहभागी झाले होते. स्वच्छता रॅलीत महात्मा गांधीजींच्या वेशात गोविंद आंधळे तर संत गाडगे महाराजांच्या वेशात गौरव खवणे यांनी प्रमुख भूमिका निभावली व दोन्हीही विद्यार्थी स्वच्छता रॅलीचे प्रमुख आकर्षण ठरले. रॅलीत रा.से.यो.च्या विद्यार्थ्यांनी स्वच्छता हिच सेवा यावरील विविध घोषवाक्याचे फलक घेवुन नारे लावत स्वच्छता रॅली महाविद्यालयापासुन ते सिव्हिल लाईन चौक व तेथून मध्यवर्ती बसस्थानकांपर्यंत स्वच्छता करत रॅली काढली. रा.से.यो. च्या स्वयंसेवकांनी जनजागृतीकरता पथनाट्य सादर केले. कार्यक्रमासाठी रश्मी जोशी-सावलकर, डॉ.समाधान मुंडे, प्रा. शैलेश जयस्वाल, प्रा.सोनाली गवांदे, डॉ. रोहित अग्रवाल, के.वाय.पाटील, किशोर शेगोकार, शैलेश अलोणे, चंद्रकांत अहिरकर व रा.से.यो, रा.छा. से च्या सर्व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले